जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी त्यांच्या उत्पन्नाच्या किमान २०% रक्कम मागासवर्गीयां-साठी खर्च करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय, क्रमांक – मागास–१०९३/सीआर–१२६५/३४,
मंत्रालय मुंबई–४०० ०३२,
दिनांक :– ९ डिसेंबर ९३.

वाचा :– शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र. मागास–१०९३/प्र. क्र. १२३९/३४, दिनांक १ सप्टेंबर ९३

प्रस्तावना :– जिल्हा परिषदांनी व पंचायत समित्यांनी वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या बाबीपासूनच्या उत्पन्नातून किमान १५% रक्कम अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व नवबौध्दांच्या कल्याणासाठी राखून ठेवून खर्च करावेत असे धोरणात्मक आदेश यापूर्वीच निर्गमित केले आहेत. तथापि, मागासवर्गीयांची लोकसंख्या लक्षात घेता व मागासवर्गीयांच्या उन्नतीला गती देण्याच्या शासनाच्या दृष्टीकोनातून हे प्रमाण वाढविण्याची बाब काही काळ शासनाच्या विचाराधीन होती.

निर्णय :– महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम २६१ पोटकलम [१] खालील अधिकाराचा वापर करुन शासन असे आदेश देत आहे की, सन १९९४–९५ या वित्तीय वर्षापासून मागासवर्गीयांसाठी राखून ठेवलेल्या निधीचे प्रमाण १५% वरुन २०% पर्यन्त वाढविण्यात यावे व एकूण २०% रक्कमेपैकी ३०% रक्कम मागासवर्गीय महिलांसाठी खर्च करण्यात यावी.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही /– xxx
[म. रा. गावीत]
उप सचिव, महाराष्ट्र शासन

जा. क्र. सकवि/योजना/आरआर/५६९/९३
समाज कल्याण विभाग,
जिल्हा परिषद, जळगांव.
दिनांक :– २७/१२/९३.
३१/१२/९३.

प्रति,
म. गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, ~~[सर्व]~~ भुसावळ
जिल्हा जळगांव.

२/– यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, जळगांव.

Panchayat Samiti ... Dept. ... Date of Receipt 4 JAN 1994